संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक येथील पेडीयाट्रिक, न्युरोसर्जरी, प्लास्टीक सर्जरी इ. विभाग नव्याने सुरु करण्यासाठी सदर इमारतीवर दोन अतिरिक्त मजले बांधण्यासाठी रु.२०४९.३१ लक्ष च्या अंदाजपत्रक व आराखड्यांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय, क्रमांकः प्रशामा २०१७/प्र.क्र.१६५/आरोग्य ३
१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १३ जून, २०१९.

प्रस्तावना :

विदर्भ, मराठवाडा व उत्तर, महाराष्ट्राच्या जलदगती विकासासाठी विविध उपाययोजनांची मा. मंत्री (वित्त व नियोजन, वने) यांनी दिनांक २० जुलै, २०१८ रोजी विधिमंडळात घोषणा केलेली होती. त्यामध्ये नाशिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अदयावत सोयी सुविधा निर्माण करण्याकरीता रु. ३५ कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत घोषणा करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने नियोजन विभाग शासन निर्णय दिनांक २०.१०.२०१८ अन्वये निधी उपलब्धतेबाबत कार्यवाही करण्याबाबत नमूद करण्यात आले होते. त्याअनुषंगाने विभागीय संदर्भ सेवा रुगणालय, नाशिक येथील पेडीयाट्रिक, न्युरोसर्जरी, प्लास्टीक सर्जरी इ. विभाग नव्याने सुरु करण्यासाठी सदर इमारतीवर दोन अतिरिक्त मजले बांधण्यासाठी सहसंचालक (रुग्णालये) यांच्याकडून प्राप्त अंदाजपत्रक व आराखड्यांना प्रशासकीय देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.या संदर्भात पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :

२. संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक येथील पेडीयाट्रिक, न्युरोसर्जरी, प्लास्टीक सर्जरी इ. विभाग नव्याने सुरु करण्यासाठी सदर इमारतीवर दोन अतिरिक्त मजले बांधण्यासाठी रु.२०४९.३१ लक्ष च्या अंदाजपत्रक व आराखड्यांना खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून पुढील प्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

RECAPITULATION SHEET			
Sr.No.	Particulars of Scope	Unit Rate Norms Rs	Cost Rs.

		Per (Sqmt/Meter/Lump Sum etc.)		Component Wise	Total
		Area	Rate		
A)	ESSENTIAL ITEMS (Components)				
१	(A) Building proper (Built Up Area – Sq.m)				
	५st Floor	२०२४.०४	२६२५०.००	५३१३१०५०	
	६st Floor	२०२४.०८	२६२५०.००	५३१३२१००	
	Total B.U.A.=	४०४८.१२		Sub total (a)	१०६२६३१५०.०
	(b) Rain/Roof Water Harvesting			१०००००	
	(c) Solar Roof Top (Mou to be executed)			१००००००	
	(d) Ramp For Handicaps			१००००००	
	(e) Furniture (४०४८.१२ x ७०%= २८३४)	२८३४	५०००	१४१७००००	
	Sub total (b+c+d+e)				१६१७००००.०
२	Water Supply & Sanitary Works		५% of (a)	Sub Total (२)	५३१३१५७.५
३	Electrification Internal		५% of (a)	५३१३१५७.५	
	External		६% of (a)	६३७५७८९	
	Fire Fighting			५००००००	

	Arrangements etc.				
				Sub Total (३)	१६६८८९४६.५
	Sub Total (A)				१४४४३५२५४.०
(B)	OPTIONAL ITEMS				
३	Air conditioning			२०००००००	
४	Lifts			१०००००००	
	Sub Total (B)			३०००००००	
	Project Cost (P) = (A)+(B)				१७४४३५२५४.०
(C)	PROVISIONS				
	(i) Contingencies ४% on (a)			४२५०५२६	
	(ii) Green Building ५% on (a)			५३१३१५७.५	
	(iii) GST १२% on (P)			२०९३२२३०	
		Sub Total (C)			३०४९५९१४.०
	TOTAL COST OF PROJECT (TPC) (A+B+C)				२०४९३११६८.०
		Say Rs. Lakhs.		२०४९.३१	
	PLINTH AREA RATES FOR				
	(i) Bldg Proper Cost		Rs.	२६२५० / Sqm	
	(ii) Elect. Works		Rs.	४१२३ / Sqm	
	(iii) Water Supply		Rs.	१३१३ / Sqm	
	(iv) For (i) + (ii) + (iii)		Rs.	३०६८५ / Sqm	

	(v) Total Project Cost = TPC + Area (as per "a")	Rs.	५०६२४/ Sqm	
	* No expenditure of Govt. involved as will be installed by entrepreneur and reduced enegy bills will be paid by user departments to the entreprenour as repayment for the expenditure incurred on the installation			

<u>अटी व शर्ती</u> :-

१) कामासाठी निविदा मागविण्याआधी सदर कामास सार्वजनिक बांधकाम विभागातील सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक राहील.

२) बांधकाम सुरु करण्यापुर्वी सदर नकाशा वास्तुशास्त्रज्ञ, सा.बा.विभाग नाशिक यांचेकडून मंजुर करुन घ्यावे.

३) सदर कामाची निविदा काढतांना प्रत्येक कामाची स्वतंत्रपणे निविदा न काढता नमूद सर्व कामांसाठी एकच निविदा काढण्यात यावी.

४) कामासाठीच्या जागेची उपलब्धता, योग्यता व जागा पुरेशी आहे किंवा नाही याबाबतची खात्री संबंधित आरोग्य संस्था प्रमुखांनी करावी.

५) क्षेत्रिय जागेच्या परिस्थितीनुसार व आरोग्य संस्थांच्या आवश्यकतेनुसार प्रस्तावित कामाची किंमत वाढणे शक्य असल्यामुळे त्यासाठी आवश्यक प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाच्या त्यात्या- भागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून करुन घ्यावेत.

६) सदरचे अंदाजपत्रक हे ढोबळ नमुना अंदाजपत्रक असल्याने, या कामांच्या सविस्तर अंदाजपत्रकांना तांत्रिकदृष्ट्या मान्यता ही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या त्यात्या- क्षेत्राच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून करण्यात येईल. अशी तांत्रिक मान्यता करीत असताना आरोग्य खात्याच्या त्यात्या- आरोग्य सेवा मंडळाच्या उप संचालकांच्या सहमतीने तरतुदी अंतिम करण्यात याव्यात.

७) सदरचे काम नवीन नमुना नकाशांप्रमाणे करावयाचे झाल्यास सार्वजनिक आरोग्य विभागाने नियुक्त केलेल्या खाजगी वास्तुशास्त्रज्ञामार्फत नकाशांप्रमाणे वास्तुमांडणी आराखडा मंजूर करुन घेण्यात यावा. तसेच स्थानिक ग्रामीण नगर विकास संस्थेच्या संबंधित नियमानुसार बांधकाम परवानगी तसेच भोगवटा प्रमाणपत्र मिळविण्याची जबाबदारी सदर नवनियुक्त वास्तुशास्त्रज्ञ व जिल्हा शल्य चिकित्सक यांची राहील. तसेच ही परवानगी मागण्यासाठीचा पत्रव्यवहार जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या स्वाक्षरीने करण्यात यावा.

८) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुख्य/ उपमुख्य वास्तुशास्त्रज्ञाकडून या कामांच्या नकाशे व वास्तुमांडणी आराखड्यांना वेगळ्या मंजूरीची आवश्यकता नाही.

९) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१ दि. १० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१०) उपरोक्त कामे सदर रक्कमेत पूर्ण होतील यांची दक्षता घ्यावी.

३. सदर प्रस्तावरील खर्च मागणी क्रमांक- एच- ८, मुख्यलेखाशिर्ष "४२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य सेवा यावरील भांडवली खर्च, ०१- नागरी आरोग्य सेवा (वैद्यकीय सहाय्य-(पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- इमारती, ११०- रुग्णालय व दवाखाने, (१)(अ(पंचवार्षिक योजनांतर्गत योजना- इमारती, (००)(०१) मोठी बांधकामे (४२१०००१४), ५३- मोठी बांधकामे" याखाली भागविण्यात यावा.

४. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक- विअप्र २०१३/प्र.क्र.३०/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्ट, भाग पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक-१, परिच्छेद क्रमांक- १३४ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय उच्चस्तरीतय सचिव समितीने दिनांक १०.०६.२०१९ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाने त्याअनुषंगाने निर्गमित बैठकीच्या इतिवृत्तानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१३१७२८३६२८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2019.06.13 19:08:07 +05'30'

(रा.शा. कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/ २ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३. संनियंत्रक तथा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अमरावती.
४. सह संचालक, आरोग्य सेवा (रुगणालय राज्यस्तर), मुंबई.
५. उप संचालक, आरोग्य सेवा मंडळ, नाशिक
६. अधिक्षक, विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, नाशिक
७. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, नाशिक.
८. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
९. जिल्हा कोषागार अधिकारी, जि.नाशिक.

१०. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमा-२), मंत्रालय, मुंबई.

११. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२. निवडनस्ती (आरोग्य-३).